दिः 16 फेब्रुवारी,2014

# काय कॉंग्रेस संसदेत प्रलंबित असलेल्या विधेयकांना बाधा पोचविण्यासाठी जबाबदार आहे?

**अरुण जेटली**

विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

मागील आठवड्यात संसदेचे सत्र सुरु होताच एका जरुरी प्रश्नावर चर्चा सुरु झाली. अनेक प्रलंबित विधेयकांना पारित न होण्यामागे जबाबदार कोण आहे? कॉग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी यांनी काल एक वक्तव्य केले ज्यात त्यांनी म्हटले होते की, भाजपाने संसदेत भ्रष्टाचार विरोधक विधेयकात बाधा आणली.

सत्य हे आहे की, युपिएच्या 10 वर्षाच्या शासनाच्या समाप्तीच्या अखेरच्या काळात कॉग्रेस काही विधेयक घेऊन आली आहे. यावेळी पक्ष संसदेच्या दोन्ही सभागृहात बहुमत घेऊ शकली नाही. यापैकी अधिकतर विधेयक आणि काही अन्य कायदे जसे रस्त्यावरील विक्रेत यांना संरक्षण प्रदान करणे किंवा बुंदेलखंड मध्ये एक केंद्रीय विश्वविद्यालय स्थापित करण्यासंबंधी विधेयकाला घेऊन काही विवाद झाला नाही. हे असे कायदे होते की, यामध्ये चर्चा केल्यानंतर मंजुर केले जाऊ शकले असते. अपंग व्यक्तींच्या अनेक संस्थांशी संबंधित जोडलेल्या मुद्दयांशी निपटण्याचे विधेयकांवर लवकरच विचार करणे आणि त्यांना पारित करण्याची मागणी करत आहेत. ज्याप्रकारे राहुल गांधी यांनी भ्रष्टाचार विरोधक कायदा पारित होऊ नये म्हणून काल भाजपाला दोषी ठरविले त्याचप्रकारे अन्य विधेयकांच्या संबंधांमध्ये दुसरे लोक अशाच प्रकारे युक्तीवाद करित आहेत.

या संबंधांमध्ये तथ्य समोर आणण्याची गरज आहे. भाजपा यापैकी कोणत्याही विधेयकाला अडथळा आणू पाहत नाही. आम्ही समर्थन देण्यास तयार आहोत. भाजपाच्या एकाही सदस्याने संसदेच्या कोणत्याही सदनातील कारवाईत बाधा आणलेली नाही. भाजपामधील कोणताही सदस्य सदनाच्या मधोमध गेला नाही. आम्ही दररोज सकाळी संसदेत येतो. दोन्ही सदनातील कारवाईत बाधा आंध्रप्रदेश याच्या विभाजनावरुन पोचवण्यात आली यावर विचारविनिमय करण्याची गरज आहे. लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभेचे सभापती दररोज संसदेची कारवाई स्थगित करित आहेत कारण की, या वातावरणात कारवाई पुढे नेणे, चालवणे शक्य नाही. मोठ्या संख्येत कॉग्रेस पक्षाचे सदस्य रोजच्या रोज दोन्ही सदनातील कारवाईमध्ये बाधा पोचवत आहेत. मी समजतो की, राहुल गांधी यांच्याजवळ संसदेत येण्यास वेळ नाही आणि त्यांच्या पक्षातील सदस्यांना जो हंगामा करित आहेत त्याची माहिती प्राप्त करण्याविषयी कोणतीही चिंता नाही. प्रमुख घोटाळ्यांमध्ये जसे की, टू-जी स्पेक्ट्रम वाटप, कोळसा खाण वाटप, राष्ट्रकूल खेळाच्या आयोजनाविषयी त्यांनी कधीही चर्चा केली नाही. मोठ्या कालावधीनंतर त्यांना याची जाणीव झाली आहे की, भ्रष्टाचार भारतीय राजनीतिचा एक प्रमुख मुद्दा आहे. इतक्या उशीरानंतर जाणीव झाल्यानंतर आपली पाठ थोपटणे आणि या विधेयकांना सरकारच्या कार्यकालाच्या समाप्तीच्या वेळी आणण्याचे वाहवा घेण्याऐवजी राहुल गांधींनी आपल्या आत बघितले पाहिजे आणि या प्रश्नाचे उत्तर ईमानदारीने शोधले पाहिजे की, विधेयकांमध्ये बाधा का येत आहे, कारण की, कॉग्रेसचे आपलेच सदस्य वेळोवेळी बाधा पोचवत आहेत त्यामुळेच त्यांना अडचणी येत आहेत. कारण की, सरकार सदनात व्यवस्था बहाल करण्यास असमर्थ आहे. ज्यावेळी राहुल गांधी यांना सत्याची जाणीव होईल आणि त्यांचा पक्ष सुधारात्मक कारवाई करेल. भाजपाला यापैकी अधिकाधिक विधेयकांना समर्थन देण्याची कोणतीही हरकत नाही.